# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० / फाल्गुन ८, १९४१ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | गृह मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | महसूल मंत्री | |
| (३) | पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री | |
| (४) | कृषी, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री | |
| (५) | रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री | |
| (६) | वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६३**

---

### कोरेगांव भिमा (जि.पुणे) येथे आंदोलन करणाऱ्यांवरील खटले मागे घेण्याबाबत

**(१) * ४५५ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ४२७६१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगांव भिमा (जि.पुणे) येथे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी तेथील विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी गेलेल्या जनसमुदायावर समाजकंटकानी हल्ले केल्याच्या निषेधार्थ तिसऱ्या दिवशी राज्यात बंद पाळण्यात येवून आंदोलने करण्यात आली असता आंदोलन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंदोलनातील आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजी मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन केलेली आहे व याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी लोकप्रतिनिधींना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर गुन्हे मागे घेण्याबाबत शासनाने दिनांक २६/१०/२०१८ रोजी गुन्ह्यांची शिफारस करण्यासाठी समिती गठीत केली. समितीने खटले मागे घेण्याबाबत शासनास शिफारस केली असून त्याआधारे खटले मागे घेण्याबाबत शासनस्तरावर प्राधान्याने कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मच्छिमारांना डिझेल परताव्याची रक्कम देण्याबाबत

**(२) * २९ श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.रविंद्र फाटक, श्री.प्रविण दरेकर, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना सन २०१८-१९ या कालावधीमध्ये दिलेली डिझेल परताव्याची रक्कम अत्यंत कमी असल्याचे निदर्शनास आले असून रायगड जिल्ह्यातील ४४ मच्छीमार संस्थांच्या २ हजार २२७ यांत्रिक मच्छीमार बोटीचा रुपये ५० कोटी ६१ लाखांचा डिझेल परतावा तसेच पालघर जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्थांचा डिझेल कर परतावा दीड वर्षापासून थकीत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील मासेमारी करणाऱ्या नौकाधारकांना लाईफ जॅकेट, डीपीडीसीचे नवीन आकर्षक योजनांतर्गत पुरविण्याबाबतची मान्यता, राहत्या घराच्या जागा मच्छिमारांच्या नावावर होणे, खेकडा संवर्धन व निम खारे कोळंबी संवर्धनसाठी पालघर जिल्ह्यात लीजवर जागा वाटप करणे, आदिवासी भागात १०० टक्के कैंद्रिय सहाय्यक योजनांतर्गत केज फिशरीसाठी लाभ देणे, फायबर शितपेटीस अनुदान पुरवठा करणे, मत्स्यबीज केंद्र स्थानिक मच्छिमार महिलांना चालविण्यासाठी देणे, मच्छिमारांना नुकसान भरपाईसाठी पॅकेज जाहीर करणे इत्यादी मागण्या प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डिझेलचा थकीत परतावा देण्याबाबत अलिबाग (जि.रायगड) मच्छिमार सोसायटीने शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मच्छिमारांना डिझेल परताव्याची थकीत रक्कम देण्याबाबत तसेच मच्छिमारांच्या प्रलंबित मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० मध्ये डिझेल तेलावरील प्रतिपुर्ती या योजनेंतर्गत राज्यातील ७ सागरी जिल्ह्यांना खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | जिल्हा | वाटप केलेली तरतूद | |
|---|---|---|---|
| | | २०१८-१९ | २०१९-२० |
| १ | पालघर | १.७५ | ४.३० |
| २ | ठाणे | १.७५ | ३.३० |
| ३ | मुंबई-उपनगर | १४.२५ | १४.९३ |
| ४ | मुंबई-शहर | १३.२५ | १५.०१ |
| ५ | रायगड | ११.५० | १८.२५ |
| ६ | रत्नागिरी | ९.०० | १६.३५ |
| ७ | सिंधुदुर्ग | २.५ | ५.८६ |
| एकूण | | ५४.०० | ७८.०० |

तसेच आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात रुपये १३७.८५ कोटी इतक्या निधीची मागणी करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

१) लाईफ जॅकेट योजनेस जिल्हा नियोजन योजनेंतर्गत मान्यता नाही.

२) मच्छीमारांच्या राहत्या घराच्या जागा मच्छीमारांच्या नांवावर करण्याची कार्यवाही महसूल विभागांतर्गत सुरु आहे.

३) खाजण जमीन वाटपाबाबतचे महसूल विभागाचे सन २००२ व २००५ चे शासन निर्णय आहेत. या शासनाच्या धोरणानुसार खाजण जमीन वाटपाची कार्यवाही केली जाते.

४) पालघर जिल्ह्यात मानव विकास कार्यक्रमांतर्गत आदिवासी बहूल भागातील आदिवासींकरीता पिंजरा मत्स्यसंवर्धन योजना राबविण्यात येणार आहे.

५) मच्छीमारांच्या झालेल्या नुकसानीपोटी आर्थिक मदत मंजूरीबाबत रुपये ५.०५ कोटी इतक्या रकमेचा प्रस्ताव मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात आलेला आहे.

(३) व (४) रायगड जिल्ह्याकरीता मच्छिमारांना डिझेल परताव्यासाठी मागील ३ वर्षात खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(रुपये कोटीत)

| वर्ष | रायगड |
|---|---|
| २०१७-१८ | १८.८६ |
| २०१८-१९ | ११.५० |
| २०१९-२० | १८.२५ |

डिझेल परताव्यासाठी वितरीत निधी डीबीटीद्वारे मच्छिमारांच्या खात्यावर थेट जमा करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावरुन केली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत

**(३) * ८८४ श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासन तसेच स्वत: शेतकरीही पीक विम्याची रक्कम भरत असताना पीक विमा कंपन्यांनी राज्यातील ९० लाख शेतकऱ्यांना अपात्र ठरविले असल्याचे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दोन लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी पीक विमा काढलेला असून माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे राज्यातील विशेषत: मराठवाड्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याचे पैसे मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत मिळत नसल्याकारणाने राज्य शासनाने केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेत बदल करण्यासाठी समिती नेमली असून या समितीने उक्त योजनेसाठी सुचविण्यात आलेल्या बदलांचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पीक विम्याची मदत देण्यास विलंब करणाऱ्या विमा कंपन्यांवर कारवाई करुन शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

खरीप हंगाम २०१९ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांनी १.२६ कोटी अर्जाद्वारे पीक विमा योजनेत भाग घेतला आहे. माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये भाग घेतलेल्या बाधित शेतकऱ्यांच्या क्षेत्राचे पंचनामे करुन अहवाल भारतीय कृषी विमा कंपनी व बजाज अलियान्झ कंपनीस पाठविण्यात आला असून विमा कंपनीकडून नुकसानीची परिगणना करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) अंशत: खरे आहे.

माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये झालेल्या अवेळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी विमा कंपनीमार्फत केंद्र शासनाच्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. योजनेत बदल सुचविण्यासाठी केंद्र शासनास राज्य शासनाकडून प्रस्ताव सादर केला आहे. तसेच मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना केली आहे.

(४) याबाबत केंद्र व राज्यस्तरावर नुकसान भरपाई निश्चित करणेबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात आला व त्यानुसार संबंधित विमा कंपन्यांना नुकसान भरपाई अदा करणेबाबत केंद्र शासनाच्या दिनांक ११/०२/२०२० च्या पत्रान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या असून विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई अदा करणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नुकसानग्रस्त मच्छिमारांना मदत देण्याबाबत

**(४) * ५२३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जयंत पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.विनायकराव मेटे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माहे ऑगस्ट ते नोव्हेंबर, २०१९ या कालावधीतील अतिवृष्टी तसेच क्यार व महाचक्रीवादळामुळे मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मच्छिमारांचे नुकसान झाले असून नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्त मच्छिमारांचे सर्वेक्षण करुन नौकाधारकांना प्रत्येकी रुपये एक लाख व नौकेवर काम करणाऱ्या खलाशांना/मच्छिमारांना रुपये २५ हजार आर्थिक मदत देण्यात यावी तसेच राज्यात मत्स्य दुष्काळ जाहीर करण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ व मच्छिमार कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मत्स्य आयुक्त यांना निवेदन देऊन केली असल्याचे दिनांक ४ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मच्छीमार बांधव एलईडी व पर्ससीन नेटद्वारे मच्छिमारी करीत असल्याने समुद्रातील माशांचे प्रमाण कमी झाल्याने पारंपारिक मच्छिमार व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डहाणू (जि.पालघर) तालुक्यात माहे ऑक्टोबर, २०१९ पासून सुरु झालेल्या परतीच्या पावसामुळे मच्छिमारांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात एलईडी व पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करुन राज्यातील नुकसानग्रस्त मच्छिमारांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

शासन अधिसूचना दिनांक २७/०४/२०१८ अन्वये एलईडी मासेमारी प्रतिबंध करण्यात आलेली आहे. तसेच शासन आदेश, दिनांक ०५/०२/२०१६ अन्वये पर्ससीन मासेमारीचे नियमन करण्यात आलेले असून, त्याअन्वये शाश्वत मासेमारी टिकून राहण्याबाबत कारवाई करण्यात येत आहे.
(३) मदत व पुनर्वसन विभागाच्या दिनांक १३/०५/२०१५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे बाधितांना द्यावयाच्या मदतीमध्ये, डहाणू तालुक्यातील मच्छिमारांचे नुकसानीचा बाबींचा समाविष्ट नसल्यामुळे आर्थिक मदत देय ठरत नाही.
(४) दिनांक ३१/१०/२०१९ पर्यंत राज्यातील एकूण १०७० अवैध मासेमारी करणाऱ्या नौकावर कारवाई केलेली आहे. तसेच दिनांक १३/०५/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय नसलेल्या बाबी समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव मदत व पुनर्वसन विभागास सादर करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांचा रब्बी पीक विमा भरुन घेण्याबाबत

**(५) * ७५३ डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लातूर, हिंगोली, बीड, सोलापूर, वाशिम, गडचिरोली, भंडारा, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या ९ जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पीक विमा उतरविण्याकरीता ९ वेळा निविदा प्रक्रिया काढण्यात येवूनही खाजगी किंवा

शासकीय विमा कंपन्यांनी सदर निविदा भरण्याची तयारी दर्शविली नसल्याने तसेच रब्बी पीक विमा उतरविण्याची अखेरची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी संपुष्टात आल्याने उपरोक्त ९ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रब्बी पीक विमा भरता येणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात रब्बीचा ३४ लाख हेक्टर्सवर पेरा झालेला असून या ९ जिल्ह्यामध्ये रब्बी हंगामाचा पेरा १८ ते २० लाख हेक्टर्सवर झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी, विविध शेतकरी संघटनांनी, लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे पीक विमा भरुन घेण्यासंदर्भात मागणी करुनही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांचा रब्बीचा पीक विमा भरुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय.

(२) होय.

(३) हे खरे नाही, १० जिल्ह्यांमध्ये ई-निविदा प्राप्त न झाल्याने कृषी विभागाच्या दिनांक २६/११/२०१९ च्या पत्रान्वये केंद्र शासनास समूह फेररचना व फेरनिविदेबाबत कळविण्यात आले होते. तसेच दिनांक १८/१२/२०१९ च्या मुख्य सचिव यांचे पत्राव्दारे विमा सहभागाची अंतिम मुदत वाढविणेबाबत व निविदा प्राप्त न होणेबाबत केंद्र शासनास अवगत करण्यात आले होते. तसेच शासन निर्णय, क्र. प्रपिवियो-२०१९/प्र.क्र.१८४/११अे, दिनांक ३०/०१/२०२० अन्वये मा.मंत्री (कृषी) यांचे अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. सदर समिती धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शिफारस करणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पोलीस ठाण्यात महिला कर्मचाऱ्यांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) * ७६८ श्री.अंबादास दानवे, श्री.जयंत पाटील, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस ठाण्यात महिला पोलिसांसाठी विश्रामगृह व स्वच्छतागृहे नसल्याबाबतची माहिती पोलीस महासंचालकांनी मागविलेल्या अहवालातून निदर्शनास आले असून महिला पोलिसांसाठी विश्रामगृह व स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्यामुळे गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील १८ पोलीस ठाण्यात महिला कर्मचाऱ्यांसाठी विश्रामगृह नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील पोलीस ठाण्यात महिला कर्मचाऱ्यांसाठी विश्रामगृह, स्वच्छतागृहे व आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व विश्रामगृह उपलब्ध आहेत. तसेच राज्यात (बृहन्मुंबई वगळता) एकूण १०२१ पोलीस ठाण्यांपैकी ८३८ पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व ५९० पोलीस ठाण्यांमध्ये स्वतंत्र विश्रामगृह उपलब्ध आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरातील बोरीवली-दहिसर परिसरात दरोडा व घरफोडीचे गुन्ह्यातील दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(७) * २४३ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील बोरीवली-दहिसर परिसरात गेल्या वर्षभरात दरोडा आणि घरफोडीचे अनेक गुन्हे घडत असून या गुन्ह्यांचा तपास करुन आरोपींना अटक करण्यात स्थानिक पोलिसांना अपयश आले असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दरोडा व घरफोडीचे गुन्ह्यातील दोषींवर कारवाई करुन प्रलंबित असलेल्या गुन्ह्यांच्या तपासासाठी विशेष पथक नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) नमूद गुन्ह्यातील अटक आरोपीतांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. तसेच, तपासाधीन असलेले गुन्ह्यांचा तपास करण्याकरीता विशेष पथकाची नेमणूक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) येथे पासपोर्ट कार्यालय सुरु करण्याबाबत

**(८) * ८७७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रत्येक जिल्ह्यात पासपोर्ट कार्यालय असावे असा निर्णय केंद्र शासनाने सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असून रायगड जिल्ह्यात पासपोर्ट कार्यालय नसल्यामुळे पासपोर्ट काढण्यासाठी येथील नागरिकांना ठाणे येथे जावे लागत असल्याने अलिबाग (जि.रायगड) या जिल्हा मुख्यालयात

पासपोर्ट कार्यालय उघडावे यासाठी रायगड जिल्हा परिषदेमार्फत दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा डाक अधीक्षक कार्यालयाशेजारी पासपोर्ट कार्यालयाची इमारत माहे मार्च, २०१९ मध्ये पूर्ण झालेली असून पासपोर्ट कार्यालय सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अलिबाग येथे पासपोर्ट कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२), (३) व (४) पासपोर्ट कार्यालय सुरू करण्याची बाब केंद्र शासनाच्या विदेश मंत्रालयाच्या अखत्यारीत येते.

रायगड जिल्हा मुख्यालयात पासपोर्ट कार्यालय उघडावे यासाठी जिल्हा परिषद रायगड यांनी जिल्हा परिषदेच्या दिनांक २७/०३/२०१८ च्या सभेत ठराव घेवून जिल्हाधिकारी, रायगड व पासपोर्ट कार्यालय, ठाणे यांचेकडे दिनांक १५/०५/२०१८ रोजी पाठविला होता.

विदेश मंत्रालयाने ज्या जिल्ह्यांमध्ये पासपोर्ट सेवा केंद्र नाही तेथे पोस्ट ऑफीस पासपोर्ट सेवा केंद्र उभारण्यास तत्वत: मान्यता दिली आहे. त्यानुसार पोस्ट ऑफिस अलिबाग येथे पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, पोस्ट खात्याने अलिबाग येथे उपलब्ध केलेली जागा पुरेशी नसल्याने पोस्ट खात्यास अन्यत्र पुरेशी जागा उपलब्ध करून देण्याबाबत क्षेत्रिय पासपोर्ट कार्यालयाने कळविले असून पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र सुरू करण्याची बाब विदेश मंत्रालय, भारत सरकार यांच्या विचाराधीन आहे.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील खाडी व समुद्रकिनाऱ्यावरील अवैध रेती उपसा रोखण्याबाबत

**(९) * २९४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्याच्या विविध ठिकाणच्या खाडी व समुद्रकिनारी अवैधरित्या रेती उपसा केला जात असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुईगांव आणि रानगांव, अर्नाळा, नारिंगी, कोपरी खानिवडे इ. ठिकाणी बेकायदा रेती उपसा होत असतानाही पोलीस यंत्रणा व महसूल विभागाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैधरित्या रेती उपसा होत असल्याने मच्छिमारांची घरे पाण्याखाली गेली असून पश्चिम पट्ट्यातील बागायतदारांनाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या रेती उपसा करणाऱ्यांवर तसेच अवैध रेती उपसा रोखण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अवैध रेती उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) वसई तालुक्यातील मौजे भुईगांव, रानगांव, अर्नाळा या ठिकाणी वाळूचे अवैध उत्खनन झाल्याचे, मच्छिमारांची घरे पाण्याखाली गेल्याची तसेच पश्चिम पट्टयातील बागायतदारांचे नुकसान झाल्याची बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.

तथापि, वसई तालुक्यातील मौजे खानिवडे, कोपर, खार्डी व शिरगांव या ठिकाणी वाळूचा अवैध उपसा होत असल्याचे दृष्टोत्पत्तीस आले आहे.

पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्याकरीता भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत वसई तालुक्यात माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतुकीच्या ६१ प्रकरणी

दंडात्मक कार्यवाही करुन रुपये २७.४९ लक्ष इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे. तसेच वाळू उपश्याकरीता वापरण्यात येणारे साहित्य, २४६ वाळूच्या कुंड्या तसेच १२७५ ब्रास वाळूसाठा नष्ट करण्यात आला आहे व ७ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणांचा पुरवठा करण्याबाबत

**(१०) * ६१७ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१४-२०१५ ते २०१७-२०१८ या कालावधीत शेतकऱ्यांना आवश्यक दर्जेदार बियाणे उपलब्ध होवू न शकल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचा निष्कर्ष कॅगने नोंदविला असल्याचे दिनांक ३ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील शेतकऱ्यांना बियाणे पुरविणाऱ्या यंत्रणेत सुसुत्रता आणून शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणांचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) भारताचे नियंत्रक व महालेखा निरीक्षक यांच्या लेखापरिक्षण अहवालात सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ आणि २०१७-२०१८ या वर्षात एकूणच बियाण्यांच्या उपलब्धतेमध्ये तूट झाली असल्याचे नमूद केलेले आहे.
(२) महाराष्ट्रात राज्य बियाणे महामंडळ, अकोला, राष्ट्रीय बीज निगम, पुणे, कृषी विद्यापीठे इत्यादी यांच्यामार्फत सत्यप्रत/प्रमाणित बियाण्यांच्या उत्पादनाचे नियोजन करण्यात येते. खाजगी कंपन्यासुध्दा बियाणांचे उत्पादन करुन सत्यप्रत/प्रमाणित बियाणांचा पुरवठा करतात. त्यानुसार शेतकऱ्यांना

आवश्यक असलेली बियाणांची मागणी प्रमाणित बियाणे आणि सत्यप्रत बियाण्यांचा पुरवठा करुन पूर्ण करण्यात येते. काही शेतकरी स्वत: जवळच्या राखून ठेवलेल्या बियाण्याचा वापर करतात. कारण शेतकऱ्यांना एकदा खरेदी केलेले प्रमाणित बियाणे पुढील दोन वर्षासाठी पेरणीसाठी वापरता येते.

ज्यावर्षी नैसर्गिक आपत्ती अवकाळी पाऊस इ.मुळे बियाणांच्या उत्पादन कमी घेऊन तुटीची परिस्थिती निर्माण होते त्यावर्षी शेतकऱ्यांनी स्वत:कडील उत्पादित केलेले बियाणे वापरण्यासाठी जनजागृती मोहिम हाती घेऊन प्रवृत्त केले जाते. त्यामुळे पेरणीमध्ये बियाणाअभावी पेरणी न करण्याची परिस्थिती उद्‌भवत नाही.

राज्य शासनाद्वारे पिकांच्या विविध वाणांचे पेरणी योग्य क्षेत्र व निर्धारित पिकनिहाय बियाणे बदल दर यांच्या आधारावर बियाण्याची आवश्यकता निर्धारीत करण्यात येते. शासकीय यंत्रणा आणि बियाणे महामंडळ, कृषी विद्यापीठे तसेच खाजगी कंपनी निर्मित प्रमाणित व सत्यप्रत बियाणे यांच्या आधारावर बियाणांच्या उपलब्धतेची खात्री करण्यात येते. या सर्व संस्थामध्ये समन्वय घडवुन व प्रत्येक हगांमपुर्व नियोजन करुन समन्वय साधून मागणीनुसार बियाणे पुरवठा केला जातो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात हुक्का पार्लरवर बंदी आणण्याबाबत

**(११) * ३२३ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक ४७५४८ ला दिनांक २६ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात हर्बलच्या नावाखाली हुक्का पार्लर सुरु असून सदर हुक्का पार्लरमध्ये अवैधरित्या अल्पवयीन मुलांना प्रवेश देण्यात येऊन त्यांना तंबाखु यासारख्या अंमली पदार्थांचे पुरवठा करण्यात येतो, त्यामुळे तरुण अंमली पदार्थांच्या व्यसनाधीन होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिपीओ चौकात हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेने दिनांक २५/१२/२०१९ रोजी छापे टाकले असता सदर ठिकाणी नियम व अटींचे उल्लघंन करुन अवैधरित्या हुक्का पार्लर सुरु असल्याचे निदर्शनास आले असून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने अवैध हुक्का पार्लरवर शासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संसदेत ई-सिगरेट हुक्क्याबद्दल विधेयक सादर केले असून त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने शिफारस अथवा भुमिका जाहीर केली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर कारवाई करुन हुक्का पार्लरवर बंदी आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये हुक्का पार्लरवर केलेल्या कारवाईमध्ये अल्पवयीन मुले अंमली पदार्थाच्या व्यसनाधीन होत असल्याचे तसेच, अंमली पदार्थ विक्री होत असल्याचे आढळून आले नाही.

नागपूर पोलीस आयुक्तालयांतर्गत कोणतेही हर्बल हुक्का पार्लर सुरु करण्याबाबत परवाना देण्यात आलेला नाही. तथापि, प्राप्त तक्रारीनुसार तंबाखुजन्य पदार्थ वापरत असल्याचे निष्पन्न झाल्यास, अशा हुक्का पार्लरवर कोटपा कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येते.

सन २०१९ या वर्षामध्ये खालीलप्रमाणे हुक्का पार्लरवर कार्यवाही करण्यात आली आहे.

| दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल किंमत |
|---|---|---|
| ३४ | ५८ | रुपये १३,९६,४४१/- |

सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ या कायद्यामध्ये दिनांक ०४/१०/२०१८ रोजी

सुधारणा झाली असून याव्दारे राज्यात हुक्का पार्लरवर बंदी घालण्यात आली आहे. सदर कायद्यातील तरतुदीनुसार एक ते तीन वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाची तसेच, रुपये ५०,०००/- ते रुपये १,००,०००/- इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

घटना क्र. १- फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन एमआयडीसी नागपूर पोलीस ठाणे येथे अपराध क्र. ७७३/२०१९, दिनांक ०१/११/१९ रोजी कलम ४(अ), २१(अ) सिगारेट व तंबाखु उत्पादने अधिनियम, २००३ अन्वये एका आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

घटना क्र. २- फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन अंबाझरी पोलीस ठाणे येथे अपराध क्र. ४६४/२०१९, दिनांक २२/११/१९ रोजी कलम ४(अ), २१(अ) सिगारेट व तंबाखु उत्पादने अधिनियम, २००३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात ३ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हा सध्या पोलीस तपासावर आहे.

घटना क्र. ३- फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन सिताबर्डी पोलीस ठाणे येथे अपराध क्र. ८१६/२०१९, दिनांक २४/१२/२०१९ रोजी कलम ४(अ), २१(अ) सिगारेट व तंबाखु उत्पादने अधिनियम, २००३ अन्वये २ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा सध्या पोलीस तपासावर आहे.

(३) केंद्र शासनाने ई-सिगारेट निर्बंधांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरीता दिनांक १८/०९/१९ पासून लागु केलेली अधिसूचना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ३०/०९/१९ व दिनांक ०२/१२/१९ अन्वये, सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणुन दिली आहे.

(४) कोटपा अधिनियम, २००३ व कोटपा अधिनियम (सुधारीत), नियम, २०१८ मधील तरतुदींचे उल्लंघन होत असल्यास, संबंधितांवर पोलीस यंत्रणेमार्फत कारवाई करण्यात येते.

जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली “राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम” अंतर्गत जिल्हास्तरीय समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर समितीमध्ये सदस्य म्हणून जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, पोलीस विभाग, आरोग्य विभाग, शिक्षणाधिकारी, शाळा, महाविद्यालयांचे प्राचार्य, सामाजिक संस्था इत्यादी सदस्य आहेत. तसेच, सनियंत्रण समितीच्या तिमाही बैठकीत वरील प्रकारास आळा घालणे कामी उपाययोजना, तंबाखु विरोधी कार्यक्रम, नागरिकांमध्ये, शाळा, महाविद्यालय येथे जनजागृती मोहिमा राबविण्यात येतात. तसेच, या प्रकरास आळा घालण्याकरीता प्राप्त तक्रारीनुसार पोलिसांमार्फत कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरिवली येथील शवविच्छेदन केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत

**(१२) * ७०७ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली येथील शवविच्छेदन केंद्रामतील अपुऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांमुळे शवविच्छेदनासाठी गोरेगाव ते पालघर तसेच ठाणे येथून येणाऱ्या मृतांच्या नातेवाईकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शवविच्छेदन केंद्रामध्ये मृत इसमाच्या नातेवाईकांना २४ तास सेवा द्यावयाच्या झाल्यास किमान ६ वैद्यकीय अधिकाऱ्यांची आवश्यकता असताना या शवविच्छेदन केंद्रामध्ये सध्या ४ पदे मंजूर असून त्यापैकी केवळ ३ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शवविच्छेदन केंद्र अद्ययावत करण्यात येवून तेथे अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी यांची संख्या वाढविण्यात यावी म्हणून लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.गृह राज्यमंत्री (शहरे) आदींकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोरिवली येथील शवविच्छेदन केंद्र अद्ययावत करण्याबाबत तसेच अतिरिक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्याही वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) हे खरे नाही.

पोलीस शल्यचिकित्सक, बृहन्मुंबई यांच्या अधिनस्त सन २००१ पासून बोरिवली, मुंबई येथे भगवती रुग्णालयाच्या आवारात शवविच्छेदन केंद्र सुरु करण्यात आले असून त्याकरीता दिनांक २२/०३/२००१ व दिनांक ३०/०६/२००८ च्या रोजीच्या शासन निर्णयान्वये विविध संवर्गाचे एकूण २९ पदे निर्माण करण्यात आली आहेत. तद्नंतर, सदर शवविच्छेदन केंद्रावरील कामाचा भार कमी करण्याकरीता दिनांक ०१/०३/२०१६ पासून सिध्दार्थ रुग्णालयाच्या आवारात गोरेगाव येथे नवीन शवविच्छेदन केंद्र सुरु करण्यात आले असून त्याकरीता दिनांक ३१/०५/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये विविध संवर्गाची एकूण २६ पदे निर्माण करण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत, सदर दोन्हीही शवविच्छेदन केंद्रात वैद्यकीय अधिकारी यांची प्रत्येकी ३ याप्रमाणे एकूण ६ पदे कार्यरत असून तेथे २४ तास सेवा देण्यात येत आहेत.

बोरिवली, मुंबई येथील शवविच्छेदन केंद्राच्या अखत्यारीत एकूण ११ पोलीस ठाणे आणि गोरेगाव येथील शवविच्छेदन केंद्राच्या अखत्यारीत एकूण १२ पोलीस ठाणे कार्यरत असून त्यांचेमार्फत प्राप्त मृतदेहाच्या शवविच्छेदनाअंती विहित प्रक्रिया पार पाडून कोणतीही गैरसोय न करता मयताच्या नातेवाईकांना तात्काळ मृतदेह देण्यात येतो.

(३) हे खरे आहे.
(४) वरील भाग- १ व २ प्रमाणे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर येथे पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(१३) * २१२ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४२६३ ला दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.बाळे (ता.उत्तर सोलापूर) या परिसरात लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पाठपुरावा केल्यामुळे सोलापूर जिल्ह्यात नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक असलेली जमीन संपादन करण्यासाठी वेगवेगळया चार मुद्यांची माहिती शासनाने दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडून मागविली असून शासनाने मागणी केलेल्या वेगवेगळया चार मुद्यांची परिपूर्ण माहिती जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी तयार करुन दिनांक २४ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रासोबत शासनास सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय पुशवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक असलेली जमीन संपादन करण्यासाठीची मागणी केलेली सर्व माहिती शासनास प्राप्त झाल्यामुळे सदर जमीन संपादन करण्यासाठी अन्य वेगवेगळया कामासाठी आवश्यक असलेला निधी मंजूर करण्याबाबत महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्याकडून आवश्यक तो प्रस्ताव मागविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला आहे काय, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सोलापूर येथे पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१), (२), (३) व (४) सोलापूर जिल्ह्यात पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यास दिनांक ०४ एप्रिल, २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनाने तत्वत: मान्यता दर्शविली आहे.

तसेच सदर महाविद्यालय स्थापनेसाठी आवश्यक असलेल्या जमीन उपलब्धतेबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडून माहिती मागविण्यात आली होती.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रान्वये सोलापूर जिल्ह्यात जमीन उपलब्धतेबाबत माहिती सादर केली आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाहीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे पुरसलगोंदी (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) गावातील शेतकऱ्यांची नक्षलवाद्यांनी हत्या केल्याबाबत

**(१४) * ४ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पुरसलगोंदी (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) गावास नक्षलवाद्यांनी वेढा घालून गावकऱ्यांना दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी जेरबंद करुन नक्षलवाद्यांनी गाव पाटील असणाऱ्या मासो या शेतकऱ्यांसह कृषी मित्र म्हणून काम करणाऱ्या ऋषी या शेतकऱ्यांची हत्या केल्याची घटना दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी गावकऱ्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत तसेच, मृत शेतकऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) पोलीस स्टेशन एटापल्ली येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे. गावकऱ्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने पुरसलगोंदी भागात नक्षलवादी चळवळीवर प्रतिबंध घालण्याकरीता विशेष अभियान पथक, जलद प्रतिसाद, पोलीस स्टेशन, उप पोलीस स्टेशन, पोलीस मदत केंद्राच्या पथकाद्वारे विशेष अभियान मोहिमेद्वारे उपाययोजना सुरु आहेत. शासनाच्यावतीने द्यावयाच्या सानुग्रह अनुदान मंजूरीचा प्रस्ताव कार्यवाही अधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील जिल्हा पशुधन विकास अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत

**(१५) * १०२४ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील जिल्हा पशुधन विकास अधिकारी यांच्या निष्काळजीपणामुळे १०० ते १२५ जनावरे अंथरवन पिंप्री (ता.जि.बीड) येथे मृत पावली असल्याचे अहवालानंतर निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड येथील जिल्हा पशुधन विकास अधिकारी यांच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांचे व शासनाचे नुकसान होत असून उक्त जिल्हा पशुधन विकास अधिकारी यांच्या निष्काळजीपणा व बेजबाबदार वर्तन तसेच कर्मचाऱ्यांना नाहक त्रास देणे याबाबत कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विरोधात आंदोलने केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा पशुधन विकास अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) मौजे अंथरवन पिंप्री, ता.जि.बीड येथे जानेवारी महिन्यात घटसर्प, अखाद्य वस्तु सेवन व परोपजीवींचा प्रादुर्भाव या कारणांमुळे ३६ जनावरे मरण पावल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) अशी बाब निदर्शनास आली नाही.

तथापि, पशुचिकित्सा व्यावसायिक संघटना महाराष्ट्र राज्य, पुणे शाखा, बीड यांनी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, बीड यांच्या मनमानी कारभाराबाबत निवेदने सादर केली असून सदर निवेदनांच्या अनुषंगाने आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना चौकशी करुन अहवाल देण्याचे निदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हा क्रीडा संकुलातील विकास कामे पूर्ण करण्याबाबत

**(१६) * ३९ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हा क्रीडा संकुलाकरीता सन २००९ मध्ये रुपये ८ कोटींचा निधी मंजूर करुनही क्रीडा संकुलातील क्रीडांगणे, इमारती, वसतिगृहे यांची कामे अपूर्णावस्थेत असून क्रीडा संकुलात दर्जेदार सोई सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना जिल्हा क्रीडा संकुलातील विविध क्रीडांगणे अंतर्गत रस्त्यासह इतर विकास कामांसाठी सन २०१८-२०१९ मध्ये रुपये २.५० कोटी निधी मंजूर होऊनही सदरहू निधी अखर्चित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जालना जिल्हा क्रीडा संकुलातील विकास कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर जिल्हा क्रीडा संकुलाकरीता सन २०१८-२०१९ मध्ये वितरीत केलेल्या रुपये २८२.५० लक्ष निधीतून करावयाच्या बहुउद्देशिय हॉल व अन्य कामांसाठी वास्तुविशारदाच्या नियुक्तीसाठी ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे. ई-निविदा प्रक्रिया झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्री रामानजनिया लिझिंग ॲण्ड फायनान्स कंपनीने गुंतवणुकदारांची आर्थिक फसवणुक केल्याबाबत

**(१७) * ११९७ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री रामानजनिया लिझिंग ॲण्ड फायनान्स कंपनीने गुंतवलेल्या पैशावर जादा टक्के व्याज देण्याचे आमिष दाखवून शेकडो गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली असल्याची घटना माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुंतवणूकदार पैशांची मागणी करण्यास कंपनीच्या हॉटेलमध्ये गेले असता त्यांना बाऊंसरकडून मारहाण करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कंपनीच्या संचालकांविरुध्द तसेच गुंतवणूकदारांना मारहाण करणाऱ्या बाऊंसरांविरुध्द कारवाई करुन गुंतवणुकदारांचे पैसे त्यांना परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी तक्रार अर्ज प्राप्त नसून कोणताही गुन्हा दाखल नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी मालाड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५/२०, भा.दं.वि. कलम १२० (ब), ४२०, ४०६, ४०९ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ३ व ४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे वर्ग करण्यात आला असून तेथील गु.र.क्र. ०२/२० भा.दं.वि. कलम १२० (ब), ४२०, ४०६, ४०९ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ३ व ४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपीत कंपनी व आरोपीत यांच्या मालमत्ता संरक्षित करण्यात आल्या असून त्यांचे बँक खाते फ्रिज करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मच्छिमारांना शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत

**(१८) * ५०४ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना शेतकरी असल्याचा दाखला शासनाकडून देण्यात येतो त्याचप्रमाणे मच्छिमारांनाही दाखला मिळायला हवा जेणेकरुन मच्छिमारांना मेडिक्लेम, भत्ता व पेन्शन आदी शासकीय योजनांचे लाभ मिळतील अशी मागणी सागरी मच्छिमार संघटनेने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मत्स्य व्यवसायाला शेतीचा दर्जा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून यास मान्यता मिळावी यासाठी राज्य शासनाने माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे, केंद्र शासनाने सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शासनास प्रतिसाद कळविला आहे काय, त्यानुसार राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील मच्छिमारांच्या या मागण्यांची दखल घेऊन मच्छिमारांचे जीवनमान सुधारण्याच्यादृष्टीने व उदरनिर्वाहाचे साधन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) नाही.
(२), (३) व (४) मत्स्य व्यवसायाला शेतीचा दर्जा देण्याची बाब केंद्र शासनाच्या अधिकार कक्षेत आहे. यानुषंगाने राज्य शासनामार्फत दिनांक १०/१०/२०१९ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास प्रस्ताव पाठविण्यात आलेला असून मत्स्य व्यवसायाला शेतीचा दर्जा देण्याची विनंती केलेली आहे.
उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून राज्य शासनास अद्यापपर्यंत कळविण्यात आलेले नाही.

-----------------

## बीड, उस्मानाबाद व लातूर जिल्हयात आदिवासींच्या जमिनी बेकायदेशीररीत्या हस्तांतरीत झाल्याबाबत

**(१९) * ८१२ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना हस्तांतरीत करण्यास बंदी असतानाही शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय बीड, उस्मानाबाद व लातूर जिल्हयात मोठ्या प्रमाणावर आदिवासींच्या जमिनींचे बेकायदेशीर व्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासींच्या सातबारावर आदिवासी जमीन हस्तांतरणास बंदी असे नियमानुसार शेरे मारण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या प्रमाणावर आदिवासींच्या जमिनी बेकायदेशीरपणे बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत होत असताना प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आदिवासी भूमीहीन होत असून या तीनही जिल्ह्यांमधील आदिवासींच्या जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतरण थांबवण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) लातूर व उस्मानाबाद जिल्हयात आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींकडे बेकायदेशीररीत्या हस्तांतरीत करण्याची प्रकरणे निदर्शनास आलेली नाहीत, तथापि, प्राप्त माहितीनुसार बीड जिल्हयातील आष्टी तालुक्यात अशी एकूण १० प्रकरणे आढळून आली आहेत.

(२) लातूर व उस्मानाबाद या जिल्हयांमध्ये आदिवासींच्या जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ वर "आदिवासी जमीन हस्तांतरणास बंदी/निर्बंध" अशा आशयाचे शेरे मारण्यात आले आहेत. तथापि, बीड जिल्हयात असे शेरे मारण्यात आले नसल्याचे आढळून आले आहे.

(३) व (४) बीड जिल्हयात आढळून आलेल्या १० प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ३६ व ३६-अ नुसार कार्यवाही करण्यात येत आहे. संपूर्ण बीड जिल्हयात अशा प्रकरणांचा शोध घेऊन त्यावर कार्यवाही करण्याबाबत जिल्हयातील सर्व तहसिलदार यांना सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच, आदिवासींच्या जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ वर हस्तांतरणास निर्बंध असल्याचे शेरे मारण्याबाबत सर्व तहसिलदारांना दिनांक १३/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत

**(२०) * ४३५ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी झालेल्या हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांनी माहे ऑक्टोंबर ते नोव्हेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे

पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबतची माहिती कृषी विभागाने विमा कंपनीकडे सादर केली असूनही विमा कंपनीकडून नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे : (**१) होय.

(२) याबाबत केंद्र व राज्यस्तरावर नुकसान भरपाई निश्चित करणेबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात आला व त्यानुसार संबंधित विमा कंपन्यांना नुकसान भरपाई अदा करणेबाबत केंद्र शासनाच्या दिनांक ११/०२/२०२० च्या पत्रान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या असून विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई अदा करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला (जि.अकोला) तालुक्यातील कुरणखेड मंडळामधील शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेचा लाभ देण्याबाबत

**(२१) * १२१८ श्री.गोपिकिशन बाजोरीया, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) तालुक्यातील कुरणखेड मंडळामध्ये अत्यल्प, अल्पभुधारक व इतर अनेक शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेचा एकही टप्पा मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे लेखी निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन किसान सन्मान योजनेपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

अकोला तालुक्यातील कुरणखेड मंडळामध्ये एकूण २२ गावे समाविष्ट असून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) योजनेंतर्गत दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या पी.एम.किसान पोर्टलच्या अहवालानुसार २२ गावामधील ३१६२ शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. त्यापैकी पहिल्या टप्यामध्ये २४३५ शेतकऱ्यांना रुपये २०००/- याप्रमाणे निधी प्राप्त झालेला आहे. उर्वरीत ७२७ शेतकऱ्यांना निधी वितरणाची प्रक्रिया केंद्र शासनस्तरावरुन करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगोले व मंगळवेढे (जि.सोलापूर) तालुक्याकरीता स्वतंत्र पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत

**(२२) * ६५७ श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील एमआयडीसी भागात स्वतंत्र पोलीस ठाणे नसल्याने सदरहू भागात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असून सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगोले व मंगळवेढे (जि.सोलापूर) हे दोन तालुके मिळून ३०० व त्यापेक्षा अधिक गावांकरीता केवळ एक पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालय कार्यरत असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन

उपविभागीय कार्यालयावर कामाचे अतिरिक्त दडपण येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील एमआयडीसी भागात स्वतंत्र पोलीस ठाणे उभारण्याबाबत तसेच सांगोले व मंगळवेढे या दोन तालुक्याकरीता स्वतंत्र पोलीस उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय निर्मिती करण्याबाबतची मागणी स्थानिक पोलीस प्रशासन, लोकप्रतिनिधींनी व स्थानिक नागरिकांनी करुन देखील याकडे शासनाकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील एमआयडीसी भागात स्वतंत्र पोलीस ठाणे उभारण्याबाबत तसेच, सांगोले व मंगळवेढे या दोन तालुक्याकरीता स्वतंत्र पोलीस उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२), (३) व (४) मोहोळ पोलीस ठाणे व सोलापूर तालुका पोलीस ठाणेचे विभाजन करून चिंचोली औद्योगिक वसाहतीमध्ये नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतच्या पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार उचित निर्णय घेण्यात येईल.

मंगळवेढा उपविभागात सांगोला व मंगळवेढा अशी एकूण २ पोलीस ठाणी असून मंगळवेढा पोलीस ठाणे हद्दीत ८१ गावे व सांगोला पोलीस ठाणे हद्दीत १०३ गावे असे मंगळवेढा उपविभागात एकूण १८४ गावे आहेत. ०१ पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यरत असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन उपविभागीय कार्यालयावर कामाचे अतिरिक्त दडपण येत असल्याची बाब खरी नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) येथील लाभार्थी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या अनुदानापासून वंचित राहिल्याबाबत

**(२३) * २८६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) पंचायत समिती अंतर्गत आदिवासी उपाययोजनेंतर्गत बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या अनुदानापासून लाभार्थी वंचित राहिल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७-२०१८ यावर्षी विहिरी पूर्ण केलेले लाभार्थी अनुदानापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत सिंचन विहिर व विहिर दुरुस्ती या घटकाचा लाभ निवड झालेले वर्ष व पुढील वर्ष असा सलग दोन वर्षात लाभ दिला जातो. सदर योजनेंतर्गत डहाणू गटामध्ये एकूण ८८ लाभार्थ्यांनी नवीन सिंचन विहिर या घटकाचे काम सुरु केले होते. त्यापैकी ७७ लाभार्थ्यांनी नवीन सिंचन विहिरीची कामे पूर्ण केलेली आहेत. परंतु उर्वरित ११ लाभार्थ्यांनी नवीन सिंचन विहिरीची कामे सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाअखेर पूर्ण न केल्याने सदर कामे अपूर्ण अवस्थेत राहिलेली आहेत.

सदरहू लाभार्थ्यांची योजनेंतर्गत मुदत संपली असली तरी संबंधित लाभार्थी अनुदानापासून वंचित राहू नयेत याकरीता सदर कामांसाठी मुदतवाढ देणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयात चोरी व घरफोडीचे प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(२४) * ५७५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यात नऊ महिन्यात २ हजार चोऱ्या ७३३ इतक्या घरफोडीच्या घटनांची नोंद पोलीस दप्तरी करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हयातील वाढत्या चोऱ्या व घरफोडीमुळे नागरिकांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती गुन्हयांचे तपास पूर्ण करुन कारवाई करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाण्यातील वाढत्या चोरी व घरफोडीचे प्रमाण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०१९ मध्ये चोरीच्या एकूण ३५७८ दाखल गुन्हयांपैकी १२७१ गुन्हे उघड झाले आहेत. तसेच, घरफोडीच्या एकूण १२७८ दाखल गुन्हयांपैकी ५०१ गुन्हे उघड झाले असून गुन्हयातील आरोपीतांना अटक करुन त्यांचेकडून घरफोडी चोरीचा माल हस्तगत करुन त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

(४) चोरी व घरफोडीच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी दिवसा व रात्रौ पायी गस्त, मोटार सायकल व जी/लाईट व्हॅन अशा प्रकारे गस्त करण्यात येत असून वेळोवेळी नाकाबंदी व कोम्बिंग ऑपरेशनची योजना राबविली जाते. संशयित/सराईत गुन्हेगारांना चेक करुन त्यांचे हालचालींवर लक्ष ठेवले जाते.

न्यायालयातून जामिनावर सुटलेल्या, शिक्षा भोगून आलेल्या व संचित रजेवर सुटलेल्या आरोपीतांच्या हालचालीसुध्दा पडताळल्या जातात. रेकॉर्डवरील ज्या गुन्हेगारांविरुध्द मालासंबंधीचे गुन्हे दाखल आहेत. तसेच, दोषसिध्द झालेल्या गुन्हेगारांचे अद्ययावत गुन्हे अभिलेख तयार करुन त्यांचेविरुध्द कडक स्वरुपाची प्रतिबंधक कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## ज्येष्ठ विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येबाबत

**(२५) * २५० श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४४४३९ ला दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्येष्ठ विचारवंत व सामाजिक कार्यकर्ते डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्या होऊन ५ वर्षाचा कालावधी होऊन सुध्दा आरोपींना अटक करण्यास तपास यंत्रणांना यश आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हत्या प्रकरणी आरोपीस अटक करण्यास तपास यंत्रणांना विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आरोपींना अटक करुन कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येचा तपास केंद्रिय गुन्हे अन्वेषण विभाग (C.B.I.) यांच्यामार्फत सुरु आहे. कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या अनुषंगाने राजारामपूरी पोलीस ठाणे कोल्हापूर येथे गु.र.नं. ३९/२०१५ भादंविस कलम ३०२, ३०७, १२०(ब), १०९, २०१, ३४, भारतीय हत्या कायदा अधिनियम कलम ३(१)/२५(१ब)(अ), ५/२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये आतापर्यंत १२ आरोपींपैकी १० आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. दोन फरारी आरोपींचा विविध राज्यातील पोलीस व गुप्तचर यंत्रणाशी समन्वय साधून, विशेष तपास पथकाकरवी कसोशीने शोध घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील संत्रा प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत

**(२६) * ११३२ श्री.प्रविण पोटे-पाटील, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील संत्रा प्रकल्पाच्या कामाचे मागील १ वर्षापूर्वी उद्‌घाटन होऊनही प्रकल्पाचे काम भूमी अधिग्रहणामुळे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संत्रा प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हयातील शासकीय विकास कामांकरीता वाळू उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७) * ८९७ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात वाळू घाट लिलाव प्रक्रिया राबविण्यात न आल्यामुळे जिल्हयातील घरकुल तसेच शासकीय विकास कामे वाळू उपलब्ध होत नसल्यामुळे बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जळगाव जिल्हयात वाळू घाट लिलाव प्रक्रिया राबवून जिल्हयातील घरकुल तसेच शासकीय विकास कामास वाळू उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) जळगाव जिल्हयात सन २०१८-२०१९ मध्ये १२ वाळूगट लिलावात विक्री गेले होते. तसेच घरकुल योजनेसाठी ६ वाळूस्थळ राखीव ठेवण्यात आले होते. सदर वाळूगटातून वाळू उचल करण्याची मुदत दिनांक ३०/९/२०१९ पर्यंत होती.

शासन निर्णय, दिनांक ३/९/२०१९ रोजीच्या नवीन वाळू धोरणातील तरतूदीनुसार सन २०१९-२०२० या वर्षाकरीता जळगाव जिल्हयातून ४० वाळूगटांचे प्रस्ताव पर्यावरण अनुमतीसाठी पर्यावरण सल्लागाराकडे सादर करण्यात आलेले आहेत. सदर वाळूगटांना पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर लिलावाची कार्यवाही करण्यात येईल.

शासन निर्णय, दिनांक ३/९/२०१९ रोजीच्या वाळू धोरणातील तरतूदीनुसार जप्त केलेल्या वाळूसाठ्यातून मागणीनुसार शासकीय कामासाठी वाळू उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिनांक २२/१०/२०१९ रोजी उपविभागीय अधिकारी यांना सूचित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा मुंढे (ता.कराड, जि.सातारा) येथील शहिद जवानाच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत

**(२८) * १०९३ श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा मुंढे (ता.कराड, जि.सातारा) येथील जवान संदीप सावंत काश्मिरच्या सीमेवर शहीद झाल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेऊन सदर शहीद जवानाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय.

(२) शासन निर्णय, क्रमांक : मासैम-२०१९/प्र.क्र.६८/२०१९/२८, दिनांक ०२/०८/२०१९ मधील तरतूदीनुसार शहीद जवानांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याकरीता आवश्यक प्रमाणपत्र (Battle Casualty Certificate) दिनांक ०४/०१/२०२० च्या पत्रान्वये मागविण्यात आले असून त्याकरीता सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्यामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) उपरोक्त कागदपत्रे तसेच सेनामुख्यालय, ॲडिशनल डायरेक्टोरेट जनरल ऑफ मॅनपॉवर (Policy & Planning), नवी दिल्ली यांचेकडून जवान संदीप सावंत शहीद झाल्याबाबतचे (Battle Casualty Certificate) अद्याप प्राप्त झालेले नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत

**(२९) * ३७४ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे २०७६ गावामधील शेतकऱ्यांच्या रुपये ३५४ कोटी २८ लाखांच्या खरीप पिकांचे नुकसान झाल्याचा अहवाल जिल्हा प्रशासनाने शासनाकडे सादर केला असूनही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीकडून नुकसान भरपाईची मदत मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याचे हप्ते भरुनही पीक विम्याचा लाभ गत ३ वर्षापासून मिळाला नसल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

सन २०१६ ते २०१८ या कालावधीमध्ये वणी (जि.यवतमाळ) तालुक्यात योजनेध्ये खरीप व रब्बी हंगामासाठी एकूण ७७३२५ शेतकरी सहभागी झाले होते. सहभागी शेतकरी अर्जदारांपैकी १५७९० शेतकऱ्यांना रुपये २४८२.५२ लाख इतकी रक्कम नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे.

(३) माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मधील अवेळी पाऊस/चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीबाबतची माहिती संबंधित विमा कंपन्यांना सादर करण्यात आली आहे. याबाबत केंद्र व राज्यस्तरावर नुकसान भरपाई निश्चित

करणेबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात आला व त्यानुसार संबंधित विमा कंपन्यांना नुकसान भरपाई अदा करणेबाबत केंद्र शासनाच्या दिनांक ११/२/२०२० च्या पत्रान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या असून विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई अदा करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ॲन्टॉप हिल (मुंबई) येथील तरुणाचा पोलिसांनी केलेल्या मारहाणीत मृत्यू झाल्याबाबत

**(३०) * १४० श्री.रामनिवास सिंह, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ॲन्टॉप हिल (मुंबई) येथील पोलीस ठाण्यात चौकशीसाठी गेलेल्या विजय हृदयनारायण सिंह (२६) यांचा पोलीस ठाण्यातील पोलिसांनी केलेल्या मारहाणीमुळे झालेल्या मृत्यूप्रकरणी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(२) असल्यास, उक्त अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) सदर प्रकरणी हिवाळी अधिवेशनामध्ये मा.मंत्री, गृह यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिनांक २४/१/२०२० रोजी अपर पोलीस आयुक्त, गुन्हे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (S.I.T.) स्थापन करुन सदर प्रकरणाची पुढील चौकशी करण्यात येत आहे.
(३) सदर प्रकरणात वडाळा टि.टि. पोलीस ठाणे येथे कर्तव्यावर असणाऱ्या २ पोलीस अधिकारी व ३ अंमलदार यांना निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठा समाजास आरक्षण देण्यासंदर्भात आंदोलन करण्यावरील खटले मागे घेण्याबाबत

**(३१) * ६७३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजास आरक्षण देण्याबाबतच्या आंदोलन काळात नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यांना मागे घेण्याची प्रक्रिया शासनस्तरावरुन सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित आंदोलकावरील गुन्हे नोंदवून घेण्याबाबत शासनस्तरावरुन काढण्यात आलेल्या आदेशात काय नमूद करण्यात आले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठा समाजास आरक्षण देण्याबाबतच्या आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) व (३) दिनांक २६/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार मराठा आरक्षण आंदोलकांवरील खटले मागे घेण्याच्या अनुषंगाने, अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने शिफारस केलेले खटले मा.मंत्रिमंडळ उपसमितीसमोर सादर करण्यात आले असून एकूण २८८ खटले मागे घेण्याबाबत मा.न्यायालयाची अनुमती मागावी असा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीने घेतलेला आहे. उर्वरित खटले मागे घेण्याबाबत शासनस्तरावर प्राधान्याने कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिवा (जि.ठाणे) येथील अनधिकृत बांधकामाबाबत

**(३२) * १३३७ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील दिवा परिसरातील सुमारे १६ वर्षापासून खाजगी, शासकीय जागांवरील ३९ चाळींसह ३८५ अनधिकृत बांधकामे दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निष्कासित करण्याची कारवाई करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या सक्षम अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात व कारकिर्दीत सदरहू बांधकामे उभारण्यात आली आहेत त्यांचेवर जबाबदारी निश्चित करून अतिक्रमण करणाऱ्या भूमाफिया, विकासक यांच्याविरोधात कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच यापुढे अशी अतिक्रमणे होणार नाही यासाठी कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ५४/२०१६ मध्ये दिनांक २७/०८/२०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार दिनांक ०६/०१/२०२० रोजी क्षेत्रिय महसूल यंत्रणेमार्फत मौजे दिवा, ता.जि.ठाणे येथील स.नं. २७३ या शासकीय जमिनीवरील एकूण ३७ चाळींमधील एकूण ३८४ खोल्या व ३५ वाणिज्य गाळ्यांचे अतिक्रमण निष्कासित करण्यात आले आहे.

ठाणे परिसरात अतिक्रमण करुन कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याचे निदर्शनास आल्यावर सदर अतिक्रमणे वेळोवेळी निष्कासित करून विकासकांविरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ मधील तरतूदींनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच, अतिक्रमण निष्कासित केलेल्या जमिनीवर संरक्षणासाठी संरक्षक भिंत घालण्याची कार्यवाही करण्यात येत असून सदर जागेवर पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यात पशुपालन योजनेंतर्गत शेतकऱ्यांना गोठ्याचे वाटप करण्याबाबत

**(३३) * १५१५ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात शेती संलग्न व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांना पशुपालन व बकरी पालनासाठी गोठा देण्याच्या योजनेंतर्गत १७१६ लाभार्थ्यांनी अर्ज करुनही १५६९ लाभार्थ्यांना गोठ्याचे वाटप झाले नसल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लाभार्थ्यांना उक्त योजनेचा लाभ न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजनेचा शेतकऱ्यांना लाभ देण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून लाभार्थी शेतकऱ्यांना गोठ्याचे वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) नाही, हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतकऱ्यांना पीक विम्याची मुदत वाढवून देऊन पोर्टलवर ऑप्शन उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३४) * १८४७ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान पीक विमा योजनांतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजनेचा शासन निर्णयात धोक्याच्या रकान्यात गारपिटीचा समावेश आहे मात्र प्रत्यक्षात विमा उतरवण्याचा रकानाच नसल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गारपीट पासून पिकांचे संरक्षण करु इच्छिणाऱ्या फळबाग धारकांना गारपिटीमुळे होणाऱ्या नुकसानीचा विमा उतरविण्यापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिरिक्त विमा हप्ता भरण्याची तयारी असलेल्या शेतकऱ्यांना सदर योजनेंतर्गत विमा उतरवण्याची मुदत संपली तरी पोर्टलवरील ऑप्शन उपलब्ध झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना उक्त योजनेंतर्गत विमा उतरण्याची मुदत वाढवून देऊन पोर्टलवर ऑप्शन उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

गारपीट हा स्थानिक आपत्ती घटक असल्यामुळे गारपीट या हवामान धोक्याची नोंद PMFBY या विमा पोर्टलवर होत नाही. योजनेमध्ये सहभागी झालेल्या शेतकऱ्यांसाठी गारपीट या हवामान धोक्यासाठीचा सहभाग ऐच्छिक आहे व याकरीता अतिरिक्त विमा हप्ता भरून त्यासाठीचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने बँकेमार्फत स्वीकारण्यात येतात.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोबिवलीमध्ये मोबाईल कंपनीच्या कंत्राटदाराला धमकावल्याबाबत

**(३५) * १९९७ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवलीमध्ये मोबाईल कंपनीच्या कंत्राटदाराला खंडणीसाठी मारझोड करुन धमकावल्याच्या प्रकरणी दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास कोळसेवाडी पोलीस स्थानकात नगरसेवकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे,

(३) तसेच, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी तक्रार अर्ज प्राप्त नसून कोणताही गुन्हा दाखल नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी मालाड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५/२०, भा.दं.वि. कलम १२० (ब), ४२०, ४०६, ४०९ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ३ व ४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे वर्ग करण्यात आला असून तेथील गु.र.क्र. ०२/२० भा.दं.वि. कलम १२० (ब), ४२०, ४०६, ४०९ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ च्या कलम ३ व ४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपीत कंपनी व व आरोपीत यांच्या मालमत्ता संरक्षित करण्यात आल्या असून त्यांचे बँक खाते फ्रिज करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील पोलिसांची पदे भरण्याबाबत

**(३६) * २०४४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात पोलीस दलातील पाच पोलिसांना काही दिवसापूर्वी हृदयविकाराचा झटका येवून त्यापैकी तीन पोलीस दगावले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी मनुष्यबळ आणि कामाचा अतिरिक्त ताण यामुळे पोलिसांच्या प्रकृतीवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कमी मनुष्यबळामुळे जिल्हयात गुन्हयांची संख्या वाढत असून गुन्हयांची चौकशी प्रकरणे प्रलंबित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्हयातील पोलिसांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) पालघर जिल्हयात जानेवारी, २०२० मध्ये ३ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचा मृत्यू झाला त्यातील २ अधिकारी/कर्मचारी यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला आहे. तर एक मृत्यू निमोनिया व कावीळ या आजाराने झाला आहे.

(२), (३), (४) व (५) पालघर जिल्हयात एकूण ३०८९ पदे मंजूर असून २८७५ पदे भरलेली आहेत तर २१४ पदे रिक्त आहेत.

पालघर जिल्हयात एकूण भाग १ ते भाग ६ शिर्षकाखालील गुन्हयांची संख्या सन २०१८ मध्ये ८३५६ गुन्हे व २०१९ मध्ये ८३२९ गुन्हे अशी आहे. गुन्हयांची आकडेवारी पाहता सन २०१९ मध्ये गुन्हयांची संख्या २७ ने कमी झालेली दिसून येत आहे.

पालघर जिल्हयातील पोलीस शिपाई संवर्गातील ३१/१२/२०१९ अखेर रिक्त असलेली ६१ पदे भरण्यासाठी दिनांक ३१/०९/२०१९ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

पदोन्नती कोट्यातील खुल्या प्रवर्गातील जागा भरण्याच्या सूचना असल्याने पदोन्नती कोट्यातील मागासवर्गीय कर्मचारी यांची काही पदे रिक्त आहेत.

पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील सरळसेवेच्या रिक्त असलेल्या २१६६ पदांची भरती वेगवेगळ्या टप्प्यांवर कार्यवाहीत आहे.

-----------------

## नागपूर जिल्हयातील शेतकऱ्यांना शेतकरी स्वाभिमान योजनेचा लाभ देण्याबाबत

**(३७) * २१२३ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने शेतकरी स्वाभिमान योजना काढून दरवर्षी शेतकऱ्यांच्या खात्यात रुपये ६ हजार अनुदान देण्याचे जाहीर करुनही नागपूर जिल्हयातील हजारो शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी स्वाभिमान योजनेंतर्गत देण्यात येणारा प्रथम हप्ता रुपये २ हजार पैकी काही गावातील ५ ते २५ शेतकऱ्यांच्या खात्यात सदर रक्कम जमा झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक १५/०२/२०२० अखेर नागपूर जिल्हयातील पी.एम. किसान पोर्टलवर नोंदणी केलेल्या एकूण १,७९,४३१ लाभार्थ्यांपैकी १,२४,९०३ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे. उर्वरीत ५४,५२८ लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

नागपूर जिल्हयातील एकूण नोंदणी झालेल्या लाभार्थ्यांपैकी सरासरी ७० टक्के लाभार्थ्यांना या योजनेचा प्रथम हप्ता जमा करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील कराडकर महाराज मठाचे मठाधिपतींची हत्या झाल्याबाबत

**(३८) * २१४१ श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील कराडकर महाराज मठाचे मठाधिपती जयवंत महाराज पिसाळ व बाजीराव जगताप यांच्यामध्ये मठाच्या मठाधिपतीवरुन (प्रमुखपद) वाद असल्याने माजी मठाधिपती बाजीराव जगताप यांनी जयवंत महाराज पिसाळ यांच्यावर दिनांक ०७ जानेवारी, २०२० रोजी चाकूने वार करुन हत्या केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पंढरपूर शहर पोलीस स्टेशन येथे भाग ५ गु.र.नं. ४२/२०२०, भा.दं.वि. कलम ३०२ प्रमाणे दिनांक ०७/०१/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी बाजीराव जगताप यांना अटक करण्यात आली आहे. सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत असून गुन्हा तपासावर प्रलंबित आहे.

(३) विलंब झाला नाही.

-----------------

## पुणे शहरातील कॉसमॉस बँकेवर सायबर हल्ला करुन कोट्यवधीची लूट केल्याबाबत

**(३९) * ४०८ श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, अॅड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कॉसमॉस बँकेच्या सर्व्हरवर दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास सायबर हल्ला करुन रुपये ९४ कोटी ४२ लाखांची लूट केल्याप्रकरणाची चौकशी पूर्ण करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने किती गुन्हेगारांना अटक करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, चौकशीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी चतु:श्रुंगी पोलीस ठाणे, पुणे शहर, येथे गु.र.क्र. ३६६/२०१८ भा.दं.वि. ४२०, १२० (बी), ४६७, ४६८, ४६९, ४७१, ३४, माहिती व तंत्रज्ञान अधिनियम कलम ४३ (ए),(बी),(सी),(ई),(जी),(आय), ६६, ८४(बी), ८५ दिनांक १४/०८/२०१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चौकशी दरम्यान दाखल गुन्हयामध्ये मूळ हॅकरने बाहेरील देशातून कॉसमॉस बँकेच्या संगणकीय प्रणालीमध्ये अनधिकृतरीत्या प्रवेश करुन बँकेच्या खातेधारकांचा ए.टी.एम. कार्ड संदर्भातील मौल्यवान व गोपनीय इलेक्ट्रॉनिक अभिलेख तसेच बँकेच्या आर्थिक व्यवहारासाठी लागणारा गोपनीय अभिलेख चोरला त्यानंतर दिनांक ११/०८/२०१८ रोजी व दिनांक १३/०८/२०१८ रोजी बँकेच्या आर्थिक व्यवहारासाठी लागणारा SWIFT सर्व्हर हॅक करुन हाँगकाँग देशामध्ये रक्कम ट्रान्सफर करुन नमुद गुन्हा घडवून आणला आहे.

सदर प्रकरणी आजपर्यंत १८ आरोपी अटक करण्यात आले आहेत तसेच त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच पाहिजे आरोपी व तांत्रिक माहिती मिळविणेसाठी एकूण ३१ देशांशी एल.आर. (लेटर रोगेटरी) मार्फतीने पत्रव्यवहार होण्याकरीता प्रकरणे दिनांक २२/०५/२०१९ रोजी अंतरिक सुरक्षा प्रभाग, गृह मंत्रालय, दिल्ली येथे सादर करण्यात आली आहेत.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात अवैधरित्या चिरेजांभा दगड उत्खनन सुरु असल्याबाबत

**(४०) * १४४८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात बेकायदा आणि विनापरवाना जांभा दगड (चिरे) उत्खनन होत असून त्याकडे तहसिलदार आणि प्रांत अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही विभागाने महसूल उत्पन्न वाढविण्याकरीता बेसुमार उत्खनन परवाने वितरीत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परवाने घेतलेल्या चिरेखाण व्यावसायिक नियमांचे उल्लघंन करुन बेसुमार उत्खनन केल्याचे तसेच परवाना एका ठिकाणचा तर उत्खनन दुसऱ्या ठिकाणी केल्याचे प्रकार निदर्शनास आले असून याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध उत्खनन करणाऱ्यावर तसेच अवैध उत्खननाकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) अशी बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देवरी (जि.गोंदिया) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या धानाचे पुंजने जाळल्याबाबत

**(४१) * ७८५ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिचगड, वांढरा, डोंगरगांव, सुंदरी, रेहळी, कडीकसा, पाउलझोडा (ता.देवरी, जि.गोंदिया) या गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील धानाचे ८० हून अधिक पुंजने अज्ञात इसमाने जाळल्याची घटना दिनांक २७/११/२०१९ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तक्रार करुन व पाठपुरावा करुनही दोषींना अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी पोलीस ठाणे, चिंचगड जि.गोंदिया येथे दिनांक २७/११/२०१९ रोजी फिर्यादी सुनिलकुमार तुकाराम वलके यांचे लेखी रिपोर्टवरुन अप.क्र. १६१/२०१९ कलम ४३५, ३४ भा.दं.वि. अन्वये, दिनांक २९/११/२०१९ फिर्यादी कुमारसाय सध्दु ताराम यांचे लेखी रिपोर्टवरुन अप.क्र. १६२/२०१९ कलम ४३५, ३४ भा.दं.वि. अन्वये आणि दिनांक ०६/१२/२०१९ रोजी फिर्यादी किसन जयराम चनाप यांचे लेखी रिपोर्टवरुन अप.क्र. १६८/२०१९ कलम ४३५, ३४ भा.दं.वि. अन्वये वेळीच गुन्हा दाखल करुन अज्ञात आरोपी निष्पन्न करण्यास कसोशिने तपास सुरु आहे.

सदर घटनेची माहिती तहसिलदार देवरी यांना देण्यात आली असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्यांचे जळालेल्या पुंजण्यांचा मोबदला मिळावा म्हणून तलाठी यांचेकडुन जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया व तहसिल कार्यालय देवरी येथे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई रेल्वे पोलीस हद्दीतील गुन्ह्यांचा जलदगतीने तपास होण्याबाबत

**(४२) * २७६ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१९ मध्ये मुंबई रेल्वे पोलीस हद्दीत चोरीचे एकूण ३१,५८४ गुन्हे घडले असून त्यांपैकी केवळ ३,३७१ गुन्ह्यांचा तपास करण्यात रेल्वे पोलिसांना यश आले असून चोरीच्या गुन्ह्यांतील ८५ टक्के आरोपी मोकाट असल्याने लाखो मुंबईकरांचा प्रवास हा चोरांच्या सावटाखाली होत असल्याचे दिनांक ८/०१/२०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई रेल्वे पोलीस हद्दीत घडलेल्या गुन्ह्यांचा तपास जलदगतीने होण्याकरीता, तसेच चोरीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१९ मध्ये मुंबई रेल्वे पोलीस हद्दीत चोरीचे एकूण ३१,५८६ गुन्हे घडले आहेत. सदर गुन्ह्यांचा सर्वतोपरी तपास करुन गुन्हे उघडकीस आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला असून एकूण ३,३७४ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले.

(२) मुंबई लोकमार्ग पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात दाखल गुन्ह्यांचा आढावा घेण्याकरीता आठवड्याच्या प्रत्येक मंगळवारी आढावा बैठक घेण्यात येते. त्यामुळे आठवड्यात घडलेल्या गुन्ह्यांचा तपास, अटक केलेले गुन्हेगार यांचा आढावा घेताल जातो. पोलीस ठाण्यांना गुन्ह्यांना प्रतिबंध घालणे, गुन्ह्यांचा सर्वतोपरी तपास वेळेत पूर्ण करणे व गुन्हे उघडकीस आण्याण्याच्या दृष्टीने सूचना देण्यात येतात.

क्रिस्प Criminal Intensive Surveillance Project ही योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत रेकॉर्डवरील आरोपींना नियमितपणे चेक करुन त्यांच्यावर निगराणी ठेवली जाते. तसेच, गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी रेल्वे स्थानकांवर २८८ सीसीटीव्ही व ४१६२ कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. त्याव्दारे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यात येते.

सर्व रेल्वे स्थानकावर फलाट गस्त पथक व गुन्हे प्रतिबंध आणि सुरक्षा पथक, रॉबरी पॉईंट व ड्रॉपिंग पॉईंट अशी पथके दिवसा व रात्रौ नियुक्त करण्यात येतात.

अशा प्रकारे पोलीस हद्दीत घडलेल्या गुन्ह्यांचा तपास जलदगतीने होण्याकरीता, तसेच चोरीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा मोहा (ता.जि.यवतमाळ) येथील जमिनीची गैरप्रकारे विक्री केल्याबाबत

**(४३) * २९३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा मोहा (ता.जि.यवतमाळ) येथे आचार्य विनोबा भावे यांच्या भुदान चळवळीच्या दरम्यान दान मिळालेल्या १००.८५ हेक्टर जमिनींच्या नोंदी महसूल विभागाच्या रेकार्डवरुन कमी करुन संबंधित प्रशासकीय अधिकारी व

भूमाफीया यांच्या संगनमताने सदर जमीन भूमाफीयांना विक्री केल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त १००.८५ हेक्टर आर जमीन ही मोहा येथील सर्वोदय ग्राम परिवार संस्थेला विविध प्रयोजनासाठी देण्यात आली असून सदर प्रकरणी तहसिल कार्यालयात ५३ गटांच्याच नोंदी व माहिती नमुन्यात समाविष्ट असल्याचे व उर्वरित ३४ गट यामध्ये कमी करण्यात आल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जमीन गैरव्यवहार प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) मौजे मोहा, ता.जि.यवतमाळ येथील अधिकार अभिलेखानुसार ४०४.६३ हे.आर. जमीन भूदान मंडळाकडे जमा झाली होती. त्यापैकी, भूदान यज्ञ मंडळाने मोहा सर्वोदय ग्राम परिवार सहकारी संस्थेला १०७.१८ हे.आर. आणि वैयक्तिक लाभार्थ्यांना २९७.४५ हे.आर. जमीन वाटप केलेली आहे.

मौजे मोहा, ता.जि.यवतमाळ येथील भूदान जमीन ८७ गटात विभागली गेली असून, गा.न.नं.१ (क)(११) नुसार केवळ ५३ गटांची माहिती त्यामध्ये समाविष्ट असून उर्वरित ३४ गटांची माहिती विसंगत व अपूर्ण असून त्याची चौकशी करण्याबाबत यवतमाळ तहसिल कार्यालयास श्री.नरेंद्र बैस, सदस्य, भुदान यज्ञ मंडळ यांचा तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने, नायब तहसिलदार (महसूल) (यवतमाळ), मंडळ अधिकारी, यवतमाळ आणि तलाठी (मोहा) यांची चौकशी समिती स्थापित करण्यात आली असून त्यांच्यामार्फत सदर प्रकरणात चौकशी करण्यात येत आहे.

तसेच, श्री.नरेंद्र बैस यांनी तत्कालीन तहसिलदार, यवतमाळ यांचे आदेश दिनांक २८/११/२००३ चे पुनर्विलोकन करण्याबाबत दिनांक १९/११/२०१९ रोजी तहसिल कार्यालय, यवतमाळ येथे अर्ज सादर केला आहे. सदर अर्ज सुनावणीस घेण्यासंदर्भात कायद्यातील तरतूदीनुसार कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत

**(४४) * १४६० श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पीक विमा योजनेंतर्गत सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी सन २०१७-२०१८ मध्ये पंतप्रधान फसल विमा योजनेचे पैसे भरुनही नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्त बागायतदार शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे तक्रारी केल्यानंतर जिल्ह्याधिकारी यांचेसमवेत स्टेट बँक व विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना विम्याचे पैसे देण्याचे आदेश जिल्हाधिकारी, रायगड यांनी बँक व विमा कंपनीचे संबंधित अधिकाऱ्यांना देऊन दोन वर्षाचा कालावधी होऊनही पीक विम्याचे पैसे मिळाले नसल्याने शेतकऱ्यांनी माहे फेब्रुवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्याचा इशारा शासनास दिला असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

सुधागड (जि.रायगड) तालुक्यात आंबिया बहार २०१७-२०१८ मध्ये आंबा या फळपिकासाठी एकूण २०४ शेतकऱ्यांनी रुपये ८.६९ लाख विमा हप्ता भरून १५८.०५ हे.क्षेत्र विमा संरक्षित केले असून सहभागी शेतकऱ्यांना विमा कंपनीमार्फत रुपये ७९.०३ लाख नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीच्या सभेमध्ये सदर प्रकरणाची पडताळणी केली असता स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा-झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड, स्टेट बँक ऑफ इंडिया, सुधागड पाली व युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा नेरळ या बँकांकडून चुका झाल्याचे निष्पन्न झाल्यामुळे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित बँकांना पीक विम्याची नुकसान भरपाई पात्र शेतकऱ्यांना अदा करणेबाबत जिल्हाधिकारी यांनी आदेश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड येथे कृषी निविष्ठा वाटपात अनियमितता झाल्याबाबत

**(४५) * १०७९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागाकडून हंगामनिहाय पीक पध्दतीनुसार गरजू, पात्र व निवडक शेतकऱ्यांना कृषी निविष्ठा दिल्या जात असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात ठराविक मर्यादेत वाटप करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड येथे मागील काही वर्षात कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी हे आर्थिक संगनमत करुन प्रत्येक गावात काही ठराविक लोकांनाच वारंवार योजनांचा लाभ मिळवून देतात, तसेच शासनाने ठरवून दिलेले मापदंड न वापरता योजनांचा लाभ अपात्र लाभार्थ्यांना दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी निविष्ठांचे वाटप केवळ कागदोपत्री दाखवून कृषी निविष्ठा परस्पर दुसरीकडे विकण्याचे अनेक प्रकार निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) कृषी विभागाकडुन हंगामनिहाय पीक पध्दतीवर आधारीत प्रकल्प राबविण्यासाठी ठरलेल्या लक्षांकानुसार निविष्ठा तसेच किड रोग संरक्षणासाठी विविधस्तरावर योजनेच्या माध्यमातुन कृषी निविष्ठा प्राप्त होतात, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आकोट (ता.पवनी, जि.भंडारा) येथील धान पिकाच्या बियाणात भेसळ झाल्याबाबत

**(४६) * ११९९ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आकोट (ता.पवनी, जि.भंडारा) येथील शेतशिवारातील हलके धान पहाणी दरम्यान धान पिकाच्या बियाणात भेसळ झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिकाच्या पाहणीदरम्यान तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती ते पंचनाम्यात नोंदविलेल्या निष्कर्षात सदर बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धान पिकाच्या बियाणामध्ये भेसळ करणाऱ्या कंपनीविरुध्द कारवाई करुन नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) मौजे आकोट, ता.पवनी, जि.भंडारा येथे ६ शेतकऱ्यांच्या धान बियाणात भेसळ असल्याच्या तक्रारी माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये प्राप्त झालेल्या होत्या.

(२) तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीच्या पाहणीमध्ये ६ शेतकऱ्यांपैकी ४ शेतकऱ्यांचे भेसळीमुळे नुकसान झालेले निष्कर्ष नोंदविले आहेत.

(३) या संबधी चौकशी सुरु असून बियाणे कंपनीस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून पुढील कायदेशीर कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील शेतकऱ्यांना अहिल्यादेवी सिंचन विहिर योजनेचा लाभ देण्याबाबत

**(४७) * ४३८ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यात अहिल्यादेवी सिंचन विहिर योजनेंतर्गत उद्दिष्ट देण्यात आले असून सिंचन विहिरीसाठी पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुनही सदर योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अहिल्यादेवी सिंचन विहिर योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) नाही. हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कवितानगर व पंढरपूर (जि.सोलापूर) येथे पोलिसांकरीता निवासस्थान बांधण्याबाबत

**(४८) * ६६० श्री.प्रशांत परिचारक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवितानगर व पंढरपूर (जि.सोलापूर) येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता कर्मचारी निवासस्थान बांधणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव शासनाने विचाराधीन घेऊन मंजूर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कवितानगर व पंढरपूर (जि.सोलापूर) येथे पोलिसांकरीता निवासस्थान बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२) व (३) कवितानगर व पंढरपूर (जि.सोलापूर) येथे निवासस्थाने बांधणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, म.रा. यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांच्याकडे पाठविण्यात आला असून तो कार्यवाहीधीन आहे. निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयात “मागेल त्याला शेततळे” या योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत

**(४९) * ५८२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात "मागेल त्याला शेततळे" या योजनेची योग्यरित्या अंमलबजावणी होत नसल्याकारणाने जिल्ह्यातील शेतकरी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याचे दिनांक २०/१०/२०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्याला ४०० शेततळ्यांचे उद्दिष्ट देण्यात आले त्यापैकी १२६ शेततळी पूर्ण झाली असून नव्याने बांधण्यात येणाऱ्या शेततळ्यांसाठी निधी मिळत नसल्याने शेततळ्यांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेततळ्यांसाठी निधी मंजूर करुन शेततळ्यांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

या योजनेंतर्गत माहे डिसेंबर, २०१९ अखेर १३१ शेततळे पूर्ण झाले असून, त्यावर रुपये ४६.३१ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परांडा (जि.उस्मानाबाद) येथील तहसिलदारावर वाळुमाफियांनी हल्ला केल्याबाबत

**(५०) * २५४ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा (जि.उस्मानाबाद) येथील तहसिलदारावर वाळुमाफियांनी ट्रॅक्टर चालवून जिवे मारण्याचा प्रयत्न केला असल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अशाप्रकारे सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या वर्षात एकूण किती घटना घडल्या आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळुमाफियांवर कारवाई करुन अशा प्रकारांना आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) वाळू माफियांकडून शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्याच्या राज्यात सन २०१८-२०१९ मध्ये ४० व २०१९-२०२० मध्ये ५४ अशा एकूण ९४ घटना घडल्या आहेत.

राज्यातील वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतुकीस परिणामकारक आळा घालण्यासाठी वाळूचे अवैध उत्खनन/वाहतूक करणे, अशा कृत्यात सहभागी होणे, प्रोत्साहन देणे अशा व्यक्तींविरूध्द "महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेटस) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१" अंतर्गत कारवाई करण्यासाठी, सदर अधिनियमात शासन अधिसूचना, दिनांक २९ जानेवारी, २०१६ मध्ये अधिसूचित महाराष्ट्र अधिनियम क्र. ५/२०१६ अन्वये सुधारणा करण्यात येऊन "वाळू तस्कर" ही संज्ञा समाविष्ट करण्यात आली आहे.

शासन निर्णय क्र.गौखनि-१०/०२१९/प्र.क्र.९/ख-१, दिनांक ३/९/२०१९ च्या सुधारित वाळू/रेती निर्गती धोरणानुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीमध्ये जमा होणाऱ्या रक्कमेतून ५ टक्केच्या मर्यादेत प्रशासकीय/आस्थापना खर्च भागविण्याची तरतूद करण्यात आली असून त्यामध्ये क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या संरक्षणासाठी सुरक्षारक्षक नियुक्त करणे व अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची तरतूद समाविष्ट करण्यात आली आहे.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी राज्यात जिल्हानिहाय व तालुकानिहाय भरारी पथके स्थापन केली असून भरारी पथकामार्फत माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत राज्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ८१४० प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रुपये ६८७९.७२ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. या प्रकरणी ८९५ गुन्हे दाखल करण्यात आले असून ४९४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच २७९० वाहने जप्त करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमळनेर (जि.जळगांव) तालुक्यातील तालुका कृषी कार्यालयाद्‌वारा बोगस लाभार्थ्यांना बियाणांचे वाटप केल्याबाबत

**(५१) * ९११ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगांव) तालुक्यातील तालुका कृषी कार्यालयाद्‌वारा बोगस लाभार्थ्यांना गहू व हरभरा बियाणे वाटप केल्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकाराबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतरही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील नरेंद्र नगर अंडरब्रिज पुलाखाली पाणी साचून अपघात होत असल्याबाबत

**(५२) * १५१६ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील नरेंद्र नगर अंडरब्रिज पुलाखाली पाणी साचत असल्यामुळे नागरीकांना ये-जा करतांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पूलाची पाहणी करून दोन आठवड्यात अहवाल सादर करण्याचे आदेश वाहतूक उपायुक्त यांना दिल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाखाली किमान १५ ते २० नागरीकांचा अपघाताने मृत्यू झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नागपूर शहरातील रस्ते खराब असल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने सुमोटो रिट याचिका क्र.८३८/२०१९ दाखल करुन घेतली आहे. त्यानुषंगाने उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दिनांक ०७/०१/२०२० रोजी झालेल्या सुनावणीत पोलीस उपायुक्त (वाहतूक) नागपूर यांना शहरातील विशेषत: सिव्हील लाईन, कामठी रोड, उप्पलवाडी व नरेंद्रनगर येथील रेल्वेमार्गाखाली जाणारे रस्ते यांची पाहणी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(२) मागील सहा वर्षातील अपघाताचा आढावा घेतला असता नरेंद्रनगर अंडरब्रीज पुलाखाली कोणाही प्रांणातिक अपघात झालेला नाही. तथापि, या ठिकाणाच्या जवळपास घडलेल्या अपघातांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

सन २०१४ पासून झालेल्या अपघातात आजपर्यंत चार व्यक्ती मृत्यूमुखी व पाच व्यक्ती गंभीर जखमी झालेल्या आहेत. सदर अपघाताच्या गुन्हा नोंदी धंतोली व बेलतरोडी पोलीस स्टेशन अप. क्र.५७/१४, १०१/१५, ६६/१८ व ४२/१९ नुसार करण्यात आल्या आहेत.

(३) व (४) सदर अंडरब्रीज पुल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत बांधण्यात आला असून तो दिनांक १८/११/२००६ रोजी नागपूर महानगरपालिकेस हस्तांतरीत केला आहे. त्यामुळे सदर पुलाची देखभाल दुरुस्ती नागपूर महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

नरेंद्रनगर अंडरब्रीज पुलाखालील रस्त्याची पातळी लगतच्या वाहणाऱ्या नाल्याच्या समतल असल्याने पावसाळ्यात पावसाचे पाणी तुंबुन राहते.

याकरीता नागपूर महानगरपालिकेने या ठिकाणी तयार केलेल्या संपात (SUMP) जमा होणारे पावसाचे पाणी काढण्यासाठी महानगरपालिकेच्या ७.५ एच.पी. क्षमतेच्या २ मड पंप, १०, ७.५ व ५ एच.पी. क्षमतेचे ३ मोनोब्लॉक पंप असे एकूण ५ पंप बसविले आले आहेत. यापंपाद्वारे सदरचे पाणी लगतच्या नाल्यात सोडण्यात येते.

सदर न्यायालयीन प्रकरणी पोलीस उपआयुक्त (वाहतूक) नागपूर यांनी चौकशी करुन अहवाल शपथपत्राद्वारे मा.उच्च न्यायालयात दिनांक ११/०२/२०२० रोजी सादर केला आहे. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील कृषी विभागाची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५३) * १८६५ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती देण्याचे काम कृषी विभागाच्या माध्यमातून होत असून जिल्ह्यातील कृषी विभागातील मंजूर ७८६ पदांपैकी २७० पदे रिक्त असल्याचे तसेच जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात कृषी सहाय्यक यांच्या ३६२ पदांपैकी ६५ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सांगली जिल्ह्यातील कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सांगली जिल्ह्यात कृषी विभागाची ७८९ पदे मंजूर असून त्यापैकी ५२७ पदे भरलेली तर २६२ पदे रिक्त आहेत. त्यापैकी जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयात कृषी सहाय्यकांची ३६२ पदे मंजूर असून त्यातील ३०८ पदे भरलेली तर ५४ पदे रिक्त आहेत.

(२) रिक्त असणारी बहुतांश पदे लिपिक (३०), अनुरेखक (५४), वाहन चालक (७) व कृषी सहाय्यक (५४) आणि कृषी पर्यवेक्षक (२८) आहेत. शासनाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणाऱ्या कृषी सहाय्यकांच्या रिक्त पदांचे प्रमाण जिल्ह्यात १४ टक्के इतकेच आहे. तुर्तास रिक्त असणाऱ्या पदांचा अतिरिक्त पदभार नजीकच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे सोपवून विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यात येत आहे.

(३) शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी महाराष्ट्र कृषी सेवा वर्ग-१ ते वर्ग-३ आणि प्रशासन अधिकारी वर्ग-१ व वर्ग-२ संवर्गातील १०० टक्के रिक्त पदे भरण्यासाठी विशेष बाब म्हणून मान्यता दिलेली आहे. त्यानुसार तांत्रिक संवर्गातील पदभरती जवळपास पूर्ण झालेली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक ३१/१०/२०१९ च्या पत्रान्वये महाराष्ट्र कृषी सेवा, गट-अ साठी १७, गट-ब साठी ८३ व गट-ब (कनिष्ठ) साठी २९९ उमेदवारांची शासनास शिफारस केलेली आहे. सद्य:स्थितीत या सर्व अधिकाऱ्यांना महसुली संवर्ग वाटप नियमावलीमधील तरतुदीनुसार संवर्ग वाटप करून सविस्तर पदस्थापना देण्याची कार्यवाही शासन मान्यतेने करण्यात येत आहे. कृषी सहाय्यकांची सरळसेवा कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागीय कृषी सहसंचालक यांचेकडून करण्यात येत आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयात पदोन्नती संदर्भातील प्रलंबित न्यायालयीन प्रकरणामुळे आरक्षणाची पदे भरण्यास निर्बंध आहेत. पदोन्नतीची खुल्या प्रवर्गाची रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात गौण खनिजाची वाहतूक करण्यासाठी बारकोडची पध्दत अवलंबविण्याबाबत

**(५४) * २०९२ श्री.महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गौण खनिजाची वाहतूक करण्यासाठी बारकोडची सक्ती करण्यात आली असून त्यासाठी सन २०१३ च्या नियमानुसार अंमलबजावणी होणे गरजेचे असताना सदरहू नियमाची अंमलबजावणी होत नसल्याने शासनाचा महसूल बुडत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध गौण खनिज वाहतुकीकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन राज्यात गौण खनिजाची वाहतूक करण्यासाठी बारकोडची पध्दत अवलंबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) राज्यात खाण व खनिज (विकास व विनियमन) नियम, २०१३ ची अंमलबजावणी होत असून गौण खनिजापैकी वाळू या गौण खनिजांची वाहतूक करण्यासाठी दिनांक १२/३/२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये बारकोडयुक्त वाहतूक पासेस वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच केंद्र शासनाच्या अधिसूचना दिनांक १५/१/२०१६ मधील तरतूदीनुसार गौण खनिज वाहतुकीकरीता बारकोडयुक्त वाहतूक पासमध्ये काही सुरक्षा मानके समाविष्ट करण्यात आले असून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी राज्यात जिल्हानिहाय व तालुकानिहाय भरारी पथके स्थापन केली असून भरारी पथकामार्फत माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत राज्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ८१४० प्रकरणी दंडात्मक कारवाई करुन रुपये ६८७९.७२ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. या प्रकरणी ८९५ गुन्हे दाखल करण्यात आले असून ४९४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच २७९० वाहने जप्त करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोकमंगल मल्टिस्टेट को.ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड (जि.सोलापूर) ने बनावट कागदपत्र सादर करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(५५) * ४१५ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४६५२० ला दिनांक २५ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकमंगल मल्टिस्टेट को.ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड (जि.सोलापूर) ने बनावट कागदपत्र सादर करुन दुग्धशाळा विस्तारीकरण आणि भुकटी प्रकल्प सुरु करण्यासाठी रुपये २४ कोटी ८१ लाख खर्चाचा प्रस्ताव सादर करुन त्याआधारे शासनाकडून अनुदान मिळविल्याप्रकरणी शासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास सोलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अनियमितता झालेली असल्याचे लोकायुक्तांनी मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली नसल्यास, चौकशी किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) होय, याप्रकरणी लोकमंगल को.ऑपरेटिव्ह सोसायटी जि.सोलापूर यांनी सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावात काही बनावट कागदपत्रे प्रस्तावासोबत सादर केले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये संस्थेच्या संचालक मंडळावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस विभागामार्फत सुरु आहे. तसेच लोकमंगल को.ऑपरेटिव्ह सोसायटी, जि.सोलापूर यांचा मंजूर केलेला प्रकल्प शासन निर्णय दिनांक २२/११/२०१८ अन्वये रद्द करण्यात आला असून वितरीत करण्यात आलेले रुपये ५.०० कोटी अनुदान व बचत खाती जमा झालेले व्याज परत घेण्यात आलेले आहे.

-----------------

## दिव्या बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स वाशी, नवी मुंबई या विकासकाने गैरव्यवहार केल्याबाबत

**(५६) * ७६७ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिव्या बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, वाशी, नवी मुंबई या डेव्हलपर्सने प्लॉट नं ४ आणि ५, सेक्टर २२, घनसोली, नवी मुंबई येथे सुरू केलेल्या इमारतीचे बांधकाम अपुर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डेव्हलपर्सनी श्री.रुपेश तुकाराम शेटे व इतर सदनिकाधारकांकडून आगाऊ रक्कम घेऊन चार वर्ष उलटूनही सदनिकेचा ताबा देण्यास तसेच इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यास संबंधित डेव्हलपर्स टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्वश्री नरेश भानुशाली, गीतेश भानुशाली, कन्हया भानुशाली तसेच दिव्या बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स यांनी सदनिकाधारकांकडून आगावू रक्कम घेऊन फसवणूक केल्याबाबतची तक्रार सदनिकाधारकांनी संबंधित विभागाकडे वारंवार करुनही याबाबत शासनाने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदनिकाधारकांना सदरहू सदनिकेचा ताबा अथवा त्यांनी डेव्हलपर्सला दिलेली रक्कम परत मिळण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्राप्त माहितीच्या अनुषंगाने श्री रुपेश तुकाराम शेटे यांचेविषयी कोणताही उल्लेख आढळून येत नाही.
(३) व (४) सदर सदनिकांधारक यांचेकडून केलेल्या तक्रारी नुसार खालील पोलीस ठाणेमध्ये गुन्हे दाखल असून न्यायप्रविष्ट आहे.

एपीएमसी पोलीस ठाणे -

१) गुरनं १६३/२०१८ भादंवि ४२०, ४६५, ४६७, ५०६, ३४

२) गुरनं ४४/२०१८ भादंवि ४२०, ४६५, ४६७, ५०६, ३४

रबाळे पोलीस ठाणे :-

३) गुरनं ४३/२०१९ भादंवि कलम ४२०, ३४

४) गुरनं ९५/२०१८ भादंवि कलम ४२०, ४०६, ३४

न्हावाशेवा पोलीस ठाणे :-

५) गुरनं ५९/२०१९ भादंवि कलम ४२०, ४०६, ३४

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील नक्षलग्रस्त हल्ल्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता दिर्घकालीन योजनेचा निधी मंजूर करण्याबाबत

**(५७) * ३७२ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील नक्षलग्रस्त भागातील अतिरेकी हल्ल्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता तेथे कार्यरत असलेल्या पोलिसांचे नेटवर्क बळकट करण्याची दिर्घ कालीन योजना तत्कालीन गृहमंत्री आर.आर.पाटील यांच्या कार्यकाळात आखण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत पोलिसांच्या गुप्त बातमीदारांना आर्थिक मदत देण्यासाठी प्रलंबित असलेल्या रुपये २.८० कोटींची मागणी गेल्या ८ महिन्यापासून शासनाच्या मंजूरीसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रक्कमेचा प्रलंबित असलेला निधीच्या मंजूरीबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) शासन निर्णय, दिनांक २७/११/२०१९ अन्वये रुपये २.८० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हयातील वाळू गैरव्यवहार प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(५८) * ११५४ श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ४३५५२ ला दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील गोंदी (ता.अंबड) व जोगलादेवी (ता.घनसावंगी) येथील वाळू गैरव्यवहार प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर तत्कालीन महसूल मंत्री यांनी कारवाई करु असे आश्वासन विधानपरिषद सभागृहाच्या सन २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील आश्वासन दिल्यानंतर दोन वर्षाचा कालावधी होऊनही दोषींवर कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंबड (जि.जालना) तालुक्यातील इंदलगाव व वाळकेश्वरचा जप्त वाळुसाठा, खोटा पंचनामा व लिलाव प्रकरणी नायब तहसिलदार, तलाठी, मंडळ अधिकारी यांच्यासह पाचजणांवर निलंबनाची कारवाई करुन या कारवाईमध्ये प्रमुख दोषींवर मात्र शासनाने कोणतीही कारवाई न करता त्यांना दोषमुक्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्यांकडून शासनाची फसवणुक केलेली रक्कम वसुल करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे गोंदी (ता.अंबड) येथे जप्त करण्यात आलेल्या वाळूसाठ्याचा चुकीचा पंचनामा केल्याप्रकरणी मंडळ अधिकारी यांच्या २ वेतनवाढी बंद केल्या असून कोतवाल, सजा गोंदी यांना निलंबित करण्यात आले आहे. तत्कालीन नायब तहसिलदार यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच तलाठी, सजा गोंदी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

मौजे जोगलादेवी, ता.घनसावंगी येथे जप्त करण्यात आलेल्या अवैध वाळूसाठ्या प्रकरणी मंडळ अधिकारी यांच्या २ वेतनवाढी कायमस्वरुपी बंद केल्या असून तलाठी व पोलीस पाटील यांना निलंबित करण्यात आले असून सर्व संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

(३) व (४) मौजे इंदलगांव, ता.अंबड येथील १३० ब्रास जप्त वाळूसाठ्याचा तसेच मौजे वाळकेश्वर, ता.अंबड येथील १८० ब्रास वाळूसाठ्याचा नियमानुसार लिलाव करण्यात आला असून लिलावाद्वारे अनुक्रमे रुपये २,८५,०००/- व

रुपये २,०५,०००/- इतका महसूल शासनास प्राप्त झाला आहे. सदर जप्त वाळूसाठ्याबाबत कोणतीही अनियमितता झाल्याचे व कोणी अधिकारी/कर्मचारी दोषी असल्याचे निदर्शनास आले नसल्यामुळे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत

**(५९) * १२०१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (जि.गोंदिया) तालुक्यात माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून पंचनामे होऊन एआयसी एग्रीकल्चर विमा कंपनीकडे पीक विमा रक्कमेसाठी प्रस्ताव पाठविला असून पीक विम्याची मदत मिळाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय.
(२) याबाबत केंद्र व राज्यस्तरावर नुकसान भरपाई निश्चित करणेबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात आला व त्यानुसार संबंधित विमा कंपन्यांना नुकसान भरपाई अदा करणेबाबत केंद्र शासनाच्या दिनांक ११/०२/२०२० च्या पत्रान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या असून विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई अदा करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुर्णा (जि.हिंगोली) नदीकाठच्या पात्रामधून अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत

**(६०) * ४४१ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्णा (जि.हिंगोली) नदीकाठच्या काऱ्हेगाव, कोंडगांव, सनलापुर, सुकी पिपळगांव, ममदापूर परिसरात नदी पात्रामधून दिवसरात्र अवैधरित्या वाळू उपसा करुन वाळू रुपये १३ ते १४ हजार रुपये प्रति दराने विक्री केल्या जात असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या वाळूमाफियांवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) पूर्णा नदीकाठच्या काऱ्हेगाव, सनलापूर, सुकी पिंपळगाव, ममदापूर ही गावे परभणी जिल्ह्याच्या अधिकारक्षेत्रात येत असून या परिसरात वाळू रुपये १३ ते १४ हजार रुपये प्रति ब्रास दराने विक्री केल्या जात असल्याची बाब दृष्टोत्पत्तीस आली नाही.

(२) परभणी जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीला प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर भरारी पथकांची तसेच चेकपोस्टवर बैठे पथकाची स्थापना करण्यात आली आहे. पूर्णा (जि.परभणी) तालुक्यात सदर पथकांमार्फत माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत गौण खनिजाचे अवैध वाहतूकीच्या ५६ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ४६.८८ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून ६२ अवैध वाळूसाठे जप्त करुन त्याच्या लिलावाद्वारे तसेच शासकीय प्रकल्पाच्या

कामासाठी उपलब्ध करुन दिलेल्या वाळूच्या स्वामीत्वधनातून रुपये ५७,७४,६२०/- इतका महसूल प्राप्त झाला आहे. पूर्णा तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीच्या १४ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरीतील बोगस कंपनीने हॉलिडेचे पॅकेज दाखवून ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत

**(६१) * ५८५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय आकर्षक हॉलिडे पॅकेजचे स्वप्न दाखवून अंधेरीतील एका बोगस कंपनीने अनेकांकडून लाखो रुपयांचा अपहार करीत फसवणूक केल्याची घटना दिनांक २५ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आंबोली पोलीस स्टेशनात अपहारासह फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने फसवणूक करणाऱ्या आरोपीवर कारवाई करुन फसवणूक झालेल्या ग्राहकांची रक्कम त्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी अंबोली पोलीस ठाणे येथे १) गु.र.क्र. १०७/१६, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, १२० (ब), ३४ २) गु.र.क्र. २२३/१८, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, १२० (ब), ३४ या प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

गु.र.क्र. १०७/१६ मधील पहिले ३ आरोपींना मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे ३० लाख रुपये मा.सत्र न्सयालय, दिंडोशी, मुंबई येथे डिमान्ड ड्राफ्टव्दारे जमा केलेली आहे. त्यामुळे, सदर गुन्ह्यातील आरोपींना मा.न्यायालयाने दिलेले संरक्षण कायम झाले असल्याने त्यांना नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली नाही.

गु.र.क्र. २२३/१८ मधील आरोपीतांपैकी एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून तपासादरम्यान रुपये २,१०,०००/- हस्तगत करण्यात आले आहेत. सदर गुन्हा न्यायप्रविष्ट असल्याने हस्तगत करण्यात आलेली रक्कम ही मा.न्यायालयाच्या आदेशानंतर ग्राहकांना परत करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे. तसेच, फसवणुकीतील उर्वरित रक्कम हस्तगत करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाडा कृषी विद्‌यापीठाने विकसित केलेले वाण अप्रमाणित असल्याबाबत

**(६२) * १४८८ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्‌यापीठामार्फत सन २०१८-१९ या वर्षी सोयाबीनचे एसएयुएस-७१ हे बियाणे विकसित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्‌यापीठाने विकसित केलेले व शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेले सदर बियाणे अप्रमाणित असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी जिल्हा परिषदेच्या कृषी समितीच्या सभापती यांनी उक्त प्रकरणी तक्रार करुन याबाबत मा.राज्यपाल महोदयांनी कारवाई करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

तथापि, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठामार्फत सन २००२ मध्ये सोयाबीनचे एसएयुएस-७१ हा वाण अधिसुचित करुन प्रसारीत करण्यात आलेला आहे.

(२) होय.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांनी उत्पादित केलेल्या सोयाबीन एसएयुएस-७१ या वाणाचे बियाणे पीक काढणी करण्यासाठी कंबाईन हार्वेस्टर वापरण्यात आले व त्यामुळे अनावधानाने त्यात अगोदर शिल्लक असलेल्या दुसऱ्या सोयाबीन वाणाचे बियाणे मिसळले गेले. त्यामुळे लातुर जिल्ह्यातील एका लॉट नंबर १०० मधील बियाण्यामध्ये भेसळ आढळून आलेली आहे.

(३) कृषी सभापती, परभणी यांनी मा.राज्यपाल कार्यालयाकडे तक्रार केली किंवा कसे याबाबत मा.राज्यपाल कार्यालयालकडे विचारणा करण्यात आली आहे.

(४) याप्रकरणी शासनाकडे अद्यापही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दूधधारक शेतकऱ्यांना दुधाचे थकित पैसे देण्याबाबत

**(६३) * २०९३ श्री.महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दूधधारक शेतकऱ्यांना गेल्या पाच महिन्यापासूनचे दुधाचे पैसे मिळाले नसल्याने याबाबतची तक्रार करण्याकरीता दूधधारक शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्र्यांची माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान भेट घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, या दूधधारक शेतकऱ्यांना दुधाचे थकित पैसे देण्यात आले आहेत काय, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दूधधारक शेतकऱ्यांना दुधाचे थकित पैसे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) याबाबतचे अभिलेख आढळून आले नाहीत.
(२) व (३) शासकीय दूध योजनेंतर्गत दूध खरेदीसाठी सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता मूळ अर्थसंकल्पाद्वारे रुपये १७१.४६ कोटी इतका निधी उपलब्ध झाला आहे. सदर दूध योजनांसाठी उक्त निधी अपूरा असल्याने विधान मंडळाच्या हिवाळी अधिवेशनात रुपये २२.०० कोटी इतका निधी पूरक मागणीद्वारे उपलब्ध करुन घेण्यात आला आहे. सदर निधी वितरीत करण्याबाबतची कार्यवाही सुरु असून त्याद्वारे प्रलंबित देयकांची रक्कम अदा करण्यात येईल. तथापि, बीड व रत्नागिरी येथील शासकीय दुध योजनेसाठी निधी अपुरा पडत असल्याने रुपये ४.३५ कोटी इतक्या निधीची पुरवणी मागणी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.